ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.
**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF/AZ/JLN/151/2008/72/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Circle, M.S.E.D.C.L.,
JALNA.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Nawalkishor Nandkishor Sahani, Geeta Lodge, Mama Chowk, Dist.Jalna. (Consumer No. 510030093516).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from. Shri Nawalkishor Nandkishor Sahani, Geeta Lodge, Mama Chowk, Dist.Jalna.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter. **The hearing is fixed on 18.11.2007 at 12.45 Hours**

You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

Copy to:-
Shri Nawalkishor Nandkishor Sahani,
Geeta Lodge, Mama Chowk,
**Dist.Jalna.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/१५१/२००८/७२**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०१/११/२००८**
**निकाल दिनांक ;- २०/११/२००८**

**श्री नवलकिशोर नंदकिशोर साहनी,**
**गीता लॉज मामा चौक,**
**जालना.**
**(ग्राहक क्र.५१००३००९३५१६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जालना गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडिया** | **सदस्य** |
| | **आ. नि. सोनवणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०१/११/२००८ रोजी जालना शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १८/११/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने वाणीज्य वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांच्या वीज मीटरवरील रिडींगची नोंद न घेता त्यांना सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आली.त्यांना देण्यात येत असलेल्या या चुकीच्या वीज बिलाची दुरूस्ती करण्याबाबत दिनांक २१/०८/२००८ च्या पत्राव्दारे त्यांनी महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाकडे विनंती केली. महावितरण कंपनीने त्यांच्या तक्रारीची दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस व्याज व दंड न आकारता सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली.

२) दिनांक १८/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस महवितरणचे नोडल अधिकारी श्री सागजकर उपस्थित होते. अर्जदार यांनी ते उपस्थित राहु शकत नसल्याचे फॅक्सव्दारे पत्राने कळविले व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरून तक्रारीचे निवारण करण्याची विनंती मंचास केली.

३) नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार अर्जदारास ऑगस्ट २००७ ते सप्टेबर २००८ या काळात सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले व ऑक्टोबर २००८ मध्ये रिडींग उपलब्ध झाल्यानंतर अर्जदारास दिलेले सरासरीवर आधारीत वीज बिल कमी करून देण्याची तयारी दर्शविली. नोडल अधिकारी यांनी आपल्या जवाबा सोबत

४) अर्जदाराचे सी.पी.एल.व स्थळ पाहणी अहवाल मंचात दाखल केला आहे.अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेली कागदपत्रे ही या प्रकरणी निर्णय घेण्यायोग्य असल्याचे आढळुन आल्यामुळे मंचाने हे प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन मार्च १९८० साली वाणीज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन महावितरण कंपनीतर्फे त्याला देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ५१००३००९३५१६ असा असुन त्यांच्या येथे बसविण्यात आलेल्या मीटर चा क्रमांक ८०००२५०००२ असा आहे. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी.पी.एल.चे अवलोकन केल्यावर असे आढळुन येते की, अर्जदारास जुलै २००७ पर्यत मीटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत होते. ऑगस्ट २००७ ते सप्टेबर २००८ या काळात लॉक स्टेटस दाखवत अर्जदारास १०७३ युनिट वीज वापराचे सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आलेली आढळुन येते. ऑगस्ट २००७ ते सप्टेबर २००८ या काळात मागील व चालु रिडींग ही ७२६२८ व ७२६२८ अशी दाखविण्यात आलेली दिसते. महावितरणच्या संबंधीत अधिका-याने दिनांक १७/११/२००८ रोजी केलेल्या स्थळपाहणी अहवालात मीटरवरील रिडींग ही ८८३६७ अशी असल्याचे तसेच जुने मीटर बदलण्यात आले नसल्याचे आढळुन येते. यावरून अर्जदाराचे मीटर हे कार्यरत असुन नियमीतपणे रिडींग न घेतली गेल्यामुळे त्यांना ऑगस्ट २००७ ते सप्टेबर २००८ या तेरा महीन्याच्या काळासाठी सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आल्याचे स्पष्ट होते. ऑगस्ट २००७ ते १७/११/२००८ या काळात अर्जदाराचा वीज वापर (८८३६७-७२६२८) ५७३९ असा असल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराच्या मीटर चे नियमीतपणे वाचन न करणे तसेच अर्जदाराने केलेल्या तक्रारीची दखल न घेणे ही सेवेतील त्रुटी मानण्यात येत असुन चुकीच्या वीज बिलापोटी अर्जदाराने केलेली तक्रार योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास ऑगस्ट २००७ नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिले रद्द करण्यात येत आहेत.

२) महावितरण कंपनीने अर्जदाराचा एकुण ५७३९ युनिट वीज वापर हा ऑगस्ट २००७ ते १७/११/२००८ या काळात विभागुन तीस दिवासात सुधारीत वीज बिल अर्जदारास द्यावे.

३) वरीलप्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

४) अर्जदाराने वरील काळात भरलेल्या वीज बिलाची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१५१/२००८/७२** **दिनांक ;-**

**प्रति**
**श्री नवलकिशोर नंदकिशोर साहनी,**
**गीता लॉज मामा चौक,**
**जालना.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१५१/२००८/७२ )

आपण दिनांक ०१/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ,जालना.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**